# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

**टेबल क्र:- १२** **पेपर कात्रण** **दिनांक :- २३/०५/२०२३**

-----------------००००००------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

३) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेरा:-

CS CamScanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक – **२३/०५/२०२३** रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा **(Heading)** | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २३.०५.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. १ | वसईच्या किल्ल्याची विटंबना | वसई | |
| २. | २३.०५.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. १ | नायगाव पूर्वेला स्थानकालगत फेरीवाल्यांचे बस्तान | नायगाव | |
| ३. | २३.०५.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. ४ | विरारमध्ये सोनसाखळी चोराला अटक | अर्नाळा / गुन्हे कक्ष ३ | |
| ४. | २३.०५.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. ४ | सफाई कर्मचाऱ्याच्या आत्महत्येप्रकरणी चौकशी समिती | वसई | |
| ५. | २३.०५.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. ३ | वसई पुर्वेच्या रस्त्यावर अवजड वाहनांचा अडथळा | वालीव | |
| ६. | २३.०५.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. १ | स्मशानभुमीच्या आवारातच आरोग्य केंद्र | वालीव | |
| ७. | २३.०५.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. ४ | बोगस कॉल सेंटर प्रकरणातील मुख्य आरोपी अद्याप फरार | अर्नाळा | |
| ८. | २३.०५.२०२३ | लोकसत्ता पु. पान क्र. १ | वसईतील रस्त्यांवर कालबाह्य टँकर | वसई विरार | |
| ९. | २३.०५.२०२३ | पुढारी पु. पान क्र. ३ | २१ तोळ्याचे दागिने पोलिसांनी केले परत | काशिमीरा | |
| १०. | २३.०५.२०२३ | पुढारी पान क्र. ७ | फाशीच्या शिक्षेतील आरोपीची सर्वोच्च न्यायालयात निर्दोष मुक्तता | भाईंदर | |
| ११. | २३.०५.२०२३ | पुढारी पान क्र. ५ | ४२ किलो गांजा विक्रीसाठी आलेल्या तिघांना अटक | काशिमीरा | |
| १२. | २३.०५.२०२३ | म.टा. पु. पान क्र. १ | नायगाव खाडीपुलाची रखडपट्टी सूरूच | नायगाव | |
| १३. | २३.०५.२०२३ | म.टा. पु. पान क्र. १ | गुंगीचे औषध देऊन वाहन चालकांची लुट | नयानगर/ गुन्हे कक्ष ३ | |
| १४. | २३.०५.२०२३ | म.टा. पु. पान क्र. १ | गटार सफाईची कामे अपुर्णच | वसई विरार | |
| १५. | २३.०५.२०२३ | म.टा. पु. पान क्र. १ | कॅन्सरग्रस्तांना मदत अर्ज देण्यास टाळाटाळ | मिरा भाईंदर | |
| १६. | २३.०५.२०२३ | म.टा. पु. पान क्र. १ | अतिक्रमणे माझ्या घातपाताची शक्यता | इतर | |

CS CamScanner

लोकसत्ता पृ.पान क्र.१

(1)

# वसईच्या किल्ल्याची विटंबना

## रील बनवताना ऐतिहासिक वास्तूला आग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई शहरातील ऐतिहासिक किल्ल्यात 'इंस्टाग्राम'वर रील बनविण्याच्या नादात एका तरुणाने ऐतिहासिक वास्तूच्या ठिकाणी आग लावल्याचा प्रकार घडला आहे. अशी विटंबना केल्याच्या प्रकरणावरून दुर्गप्रेमी व नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

वसई पश्चिमेच्या भागात वसईचा ऐतिहासिक किल्ला आहे. या किल्ल्याला विविध ठिकाणचे पर्यटक, दुर्गप्रेमी भेट देतात. सध्या या किल्ल्यात विविध विघातक प्रकार घडत आहेत. किल्ल्याच्या संवर्धनासाठी दुर्गप्रेमी झटत आहेत. असे असताना नुकतेच एका तरुणाने 'इंस्टाग्राम'वर रील तयार करण्यासाठी किल्ल्यात चित्रीकरण केले आहे. याच दरम्यान ऐतिहासिक वास्तू असलेल्या एका ठिकाणी आग लावल्याचा प्रकार घडला आहे. याची चित्रफीत देखील समाज माध्यमावर प्रसारित झाल्याने दुर्गप्रेमींनी या कृत्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

> "किल्ल्याचे पावित्र्य जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. काही पर्यटक किल्ल्यात येऊन चुकीचे कृत्य करतात त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. - नितीन म्हात्रे,
> किल्ले प्रेमी व सामाजिक कार्यकर्ते, वसई

हा किल्ल्याच्या विटंबनेचा प्रकार असून पुरातत्व विभाग, याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप केला जात आहे. असा प्रकार करणाऱ्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

या आधीही किल्ल्यात 'प्री-विडींग शूट', छायाचित्रणासोबत किल्ल्यात नासधूस केल्याचे प्रकार घडले आहेत. त्याकडे पुरातत्व विभागाने लक्ष देऊन कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, किल्ल्यातील गैरप्रकार रोखण्यासाठी पुरातत्व विभागाबरोबरच पोलिसांनीही बंदोबस्त वाढवावा, अशी मागणी होत आहे.

# नायगाव पूर्वेला स्थानकालगत फेरीवाल्यांचे बस्तान

## प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** नायगाव पूर्वेच्या स्थानकालगत असलेल्या मुख्य मार्गावर खाद्यपदार्थांची दुकाने व फेरीवाल्यांनी आपले बस्तान मांडले आहे. शुक्रवारी रात्री खाद्यपदार्थांच्या दुकानाला आग लागून सिलिंडरचा स्फोट झाला होता. या घटनेमुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पूर्व भागातून दररोज मोठ्या संख्येने नागरिक नायगाव स्थानकातून प्रवास करतात. रिक्षा तळ ते नायगाव स्थानक असा ये-जा करण्याचा एकमेव मार्ग आहे. या मुख्य मार्गात फेरीवाले व विविध खाद्यपदार्थ तयार करून विक्रीची दुकाने थाटली आहेत.

हे फेरीवाले आता चक्क प्रवाशांची ये-जा करण्याची वाट अडवू लागले आहे. तसेच या परिसरात विक्रीनंतर जे काही उरलेसुरले पदार्थ व इतर कचरा जागच्या जागी टाकून दिला जात आहे. कधी कधी या कचऱ्याला आगी लावल्या जातात. शुक्रवारी मध्यरात्री अशाच प्रकारे लावलेल्या आगीमुळे या दुकानांना आग लागली होती. याच आगीमुळे सिलिंडरचा स्फोट झाला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्रवाशांचा रेल्वे स्थानकात ये-जा करण्याचा मुख्य मार्गाजवळच ही घटना घडली होती. रात्रीची वेळ असल्याने येथील प्रवाशांची वर्दळ नसल्याने मोठी दुर्घटना टळली. असे जरी असले तरी इतर वेळी ही सिलिंडर लावून खाद्यपदार्थ तयार करण्याचे काम सुरू असते. काही वेळा डासांच्या उपद्रवापासून बचाव करण्यासाठी आगी लावल्या जातात. यामुळे अशा घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### नियम धाब्यावर

एलफिन्स्टन रोड स्थानकातील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेनंतर रेल्वे स्थानकालगत शंभर ते दीडशे मीटरपर्यंत फेरीवाले बसण्यास मज्जाव केला होता. मात्र नायगाव स्थानकालगत पूर्वेच्या भागात सर्व नियम धाब्यावर बसवून अनेक दुकाने रेल्वे स्थानकाच्या १०० मीटर परिसराच्या आत व जवळ बांधून ठेवली आहेत.

लोकसत्ता पृ.पान क्र.4

# विरारमध्ये सोनसाखळी चोराला अटक

**वसई :** वसई-विरार शहरात गुन्हे शाखा तीनच्या पथकाने एका सोनसाखळी चोराला अटक केली असून त्याच्याकडून चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे.

विरारच्या गोकुळ टाऊनशिप येथे घराखालील कट्ट्यावर बसलेल्या वृद्धेच्या गळ्यातील सोनसाखळी दुचाकीवरून आलेल्या चोराने खेचून पळ काढला होता. गुन्हे शाखा तीनच्या पथकाने या प्रकरणी सीसीटीव्हीचे चित्रण आणि तांत्रिक बाबींचा तपास करून वापी येथून शाहिद कापडिया याला अटक केली आहे. त्याच्याकडून सोनसाखळी चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे.

या प्रकरणातील आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याने सोनसाखळी चोरीसाठी वापरलेली दुचाकीही चोरीची होती. तो गुजरात येथून रेल्वेने वसई-विरार परिसरात यायचा. शहरातील दुचाकी चोरून त्याचवरून तो सोनसाखळी चोरी करायचा, अशी माहिती गुन्हे शाखा तीनचे प्रमुख प्रमोद बडाख यांनी दिली.

CamScanner

(2)

लोकसत्ता पू. पान क्र.4

# सफाई कर्मचाऱ्याच्या आत्महत्येप्रकरणी चौकशी समिती

## दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई** : वसई-विरार महापालिकेतील सफाई कर्मचारी जयंती चव्हाण यांच्या आत्महत्येप्रकरणी महापालिकेने पाच जणांची चौकशी समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अहवालानंतरच पुढील कारवाई केली जाईल, असे पालिकेने सांगितले. दरम्यान, चव्हाण यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना पालिका सेवेतून निलंबित करावे, अशी मागणी चव्हाण यांच्या भावाने केली आहे.

जयंती चव्हाण हे महापालिकेच्या प्रभाग समिती 'सी' अंतर्गत येणाऱ्या आई जीवदानी रुग्णालयात सफाई कर्मचारी या पदावर कार्यरत होते. १८ एप्रिल रोजी त्यांनी ॲसिड पिऊन आत्महत्या केली होती. आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या हेमंत भगत व अमिता संख्ये या कर्मचाऱ्यांची नावे त्यांनी मृत्यूपूर्वी पोलिसांना दिलेल्या जबाबात नोंदवली होती. कामादरम्यान जयंती चव्हाण यांनी चोरी केली, असा आरोप करून हेमंत भगत व अमिता संख्ये यांच्याकडून मानसिक त्रास दिला जात होता. या सततच्या त्रासामुळे जयंती यांनी आत्महत्या केली, असा आरोप त्यांचा भाऊ रोहित चव्हाण यांनी केला आहे.

या प्रकरणाची पोलीस आणि पालिकेकडून चौकशी सुरू असेपर्यंत दोघा कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित केले पाहिजे, अशी मागणी जयंती यांचे भाऊ रोहित आणि भाजपचे पदाधिकारी तसनीफ शेख यांनी केली आहे.

या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती स्थापन केली आहे. या समितीत अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त व अन्य असे पाच अधिकारी आहेत, असे पालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी सांगितले.

लोकसत्ता पू. पान क्र.3



# वसई पूर्वेच्या रस्त्यावर अवजड वाहनांचा अडथळा

## वाहतूक कोंडीच्या समस्येत वाढ

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई** : मुंबई-अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या वसई पूर्वेच्या रस्त्यावर अवजड वाहनांचा अडथळा निर्माण होत आहे. वाहतूक व्यावसायिकांची वाहने रस्त्याच्या दुतर्फा उभी केली जात असल्याने वर्दळीच्या रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ लागली आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गाला जोडणारा रस्ता वसई पूर्वेकडून जातो. या परिसरात औद्योगिक कंपन्या, निवासी संकुले असल्याने रस्ता वर्दळीचा असतो. परंतु या रस्त्याच्या दुतर्फा अवजड वाहने उभी केली जात आहेत. वसई पूर्वेला एव्हरशाइनच्या मधुबन ते सातिवली हा गजबजलेला रस्ता आहे. या रस्त्यावरून महामार्गावर वाहनांची ये-जा असते. मात्र रस्त्याच्या कडेला वाहतूक कंपन्यांची अवजड वाहने उभी करण्यात येत असल्याने रहदारीला अडथळे निर्माण होतात. या रस्त्यावर अनेक मोठे वाहतूक व्यावसायिक आहेत. ते आपली दहा चाकी अवजड वाहने रस्त्याच्या कडेला उभी करत असतात. तशीच परिस्थिती रेंज ऑफिस ते भोईदापाडा या ठिकाणी आहे. वसई पूर्व परिसर हा औद्योगिक वसाहतीने घेरला असल्याने संध्याकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वाहनांची आणि नागरिकांची वर्दळ असते. या वर्दळीच्या वेळी हे वाहतूक व्यावसायिक शासनाच्या सर्व नियमांना धाब्यावर बसवून सर्रासपणे वाहने रस्त्यावर उभी करत आहेत. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी सुमारे एक ते दीड तास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते आहे.

### कारवाईची मागणी

शहरात वाहने रस्त्यावर कशाही पद्धतीने उभी केली जातात. त्यामुळे दिवसेंदिवस वाहतूक कोंडीत भर पडत आहे. ही वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांवरदेखील मोठ्या प्रमाणात ताण येत असतो. या रस्त्यावर अवजड वाहने उभी करणाऱ्यांवर आणि वाहतूक व्यावसायिकांवर कारवाई करण्याची मागणी युवासेनेचे अतुल काकासाहेब मोटे यांनी केली आहे.

③

लोकसत्ता पू. पान क्र. 1

# स्मशानभूमीच्या आवारातच आरोग्य केंद्र

## महापालिकेच्या आरोग्य विभागाचा अजब कारभार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**'स्मशानभूमी आणि आरोग्य केंद्रामध्ये भिंत'**

पालिकेने मात्र या स्मशानातील आरोग्य केंद्राचे समर्थन केले आहे. जागा एक असली तरी मध्ये भिंत असल्याने दोघांचे प्रवेशद्वार वेगळे आहेत. स्मशानभूमी आणि आरोग्य केंद्र वेगळे असून, परस्परांशी त्यांचा संबंध नसल्याचे पालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी सांगितले.

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या आरोग्य विभागाचा आणखी एक अजब प्रकार उघडकीस आला आहे. पालिकेने सातिवली येथे चक्क स्मशानभूमीच्या आवारातच आरोग्य केंद्र उभारले आहे. स्मशानभूमीत आरोग्य केंद्र न बनवण्याची स्थानिकांची मागणी धुडकावून पालिकेने हे केंद्र उभारले असून, लवकरच ते सुरू केले जाणार आहे.

महापालिकेने नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आरोग्य केंद्रे वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या महापालिकेची एकूण सात रुग्णालये, दोन माता बालसंगोपन केंद्रे, २१ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रे आणि चार बाह्यरुग्ण विभाग केंद्रे आहेत. आता पालिकेने वसई पूर्वेतील सातिवली येथील मौर्या नाका येथे नवीन आरोग्य केंद्र सुरू केले आहे. मात्र हे आरोग्य केंद्र बघितल्यावरच नागरिकांच्या मनात धडकी भरते. कारण हे आरोग्य केंद्र चक्क स्मशानभूमीच्या आवारातच उभारण्यात आले आहे.

स्मशानभूमीच्या एका भागात स्मशानासाठी लागणारी लाकडे ठेवण्यात येत होती. ती जागा बरीच मोठी होती. त्यामुळे पालिकेने तिथे आरोग्य केंद्र तयार केले आहे. स्मशानाच्या आवारातच आरोग्य केंद्र बनविल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्मशानभूमीच्या आवारातच आरोग्य केंद्र ही कल्पनाच करवत नाही. स्मशानात जळणाऱ्या मृतदेहांचा धूर या आरोग्य केंद्रात येऊन त्याचा त्रास रुग्णांना होईल, अशी तक्रार स्थानिकांची आहे.

या प्रभागाचे माजी नगरसेवक सुनील आचोळकर यांनी देखील या आरोग्य केंद्राला जोरदार विरोध केला आहे. स्मशानभूमीच्या आवारात आरोग्य केंद्र उभारण्यास माझा सुरवातीपासूनच विरोध होता. तसे मी प्रशासनाला वारंवार कळवले होते. परंतु, विरोध डावलून पालिकेच्या आरोग्य विभागाने हे आरोग्य केंद्र तयार केले आहे, असे आचोळकर यांनी सांगितले. हे केंद्र सुरू झाल्यावर रुग्ण त्याकडे पाठ फिरवतील, असेही ते म्हणाले.

लोकसत्ता पू. पान क्र. 4

# बोगस कॉल सेंटर प्रकरणातील मुख्य आरोपी अद्याप फरार

## कोट्यवधींची फसवणूक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरारच्या राजोडी समुद्र किनाऱ्यावरील एका रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या बोगस कॉल सेंटर प्रकरणातील मुख्य तीन आरोपी अद्याप फरार आहेत. या कॉल सेंटरद्वारे ऑस्ट्रेलियातील बँकेच्या शेकडो ग्राहकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे तपासात उघड झाले आहे.

वसई पश्चिमेच्या समुद्र किनाऱ्यावर अनेक रिसॉर्ट आहेत. राजोडी येथील एका रिसॉर्टमध्ये एक बोगस कॉल सेंटर सुरू असल्याची माहिती अर्नाळा सागरी पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी ९ एप्रिल रोजी या रिसॉर्टवर छापा टाकून हे बोगस कॉल सेंटर उघडकीस आणले होते. यावेळी कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या ४९ तरुण-तरुणींना अटक करण्यात आली होती.

या प्रकरणात रवी सिंग, नवीन भूमक आणि मलखित सिंग हे तीन मुख्य आरोपी आहेत. ते देशभरातील तरुण-तरुणींना कामाचे प्रलोभन दाखवून हे बोगस कॉल सेंटर चालवत होते. या कॉल सेंटरद्वारे ऑस्ट्रेलियन बँकेची फसवणूक केली जात होती. या कॉल सेंटरमधून ऑस्ट्रेलियाच्या 'पे पाल' या बँकेच्या ग्राहकांचे पैसे परस्पर वळवून त्यांची आर्थिक फसवणूक केली जात होती. अर्नाळा सागरी पोलिसांनी याप्रकरणी ऑस्ट्रेलियन बँकेशी संपर्क साधला होता. आतापर्यंत शेकडो ग्राहकांना कोट्यवधी रुपयांचा गंडा या कॉल सेंटरद्वारे घालण्यात आला होता.

या प्रकरणातील मुख्य तिन्ही आरोपी फरार आहेत. त्यांचा आम्ही शोध घेत असून, तीन वेळा आमचे पथक परत आले, अशी माहिती अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव करपे यांनी दिली. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या सर्व ४९ जणांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.

(4)

लोकसत्ता पृ. पान क्र.१

पुढारी पृ. पान क्र.३

# वसईतील रस्त्यांवर कालबाह्य टँकर

## अपघातांचा धोका

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**वसई :** वसई-विरार शहरातील रस्त्यावर आजही कालबाह्य झालेले टँकर धावत आहेत. या टँकरमुळे अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागली आहे. वाहतूक पोलीस आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून कारवाई होत नसल्याने हे नादुरुस्त टँकर राजरोस रस्त्यावरून धावत असून, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

वसई-विरार शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे इमारती, चाळी, गृहसंकुले अशा ठिकाणी टँकरची मागणी अधिक असून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. शहरात सुमारे एक हजारांहून अधिक टँकर शहरातील रस्त्यांवर धावतात. मात्र यातील काही टँकर मालक व चालक नियमांचे पालन करीत नसल्याने अपघाताच्या घटना घडतात.

काही टँकर अतिशय जुने झाले असून त्यांची कालमर्यादा संपली आहे. तर काही टँकरच्या पाण्याच्या टाक्याही गंजून गळक्या झाल्या आहेत. त्यातून संपूर्ण रस्त्यावर पाणी सांडून रस्ते ओलेचिंब होतात. वाहनचालकांनाही धोकादायक प्रवास करावा लागतो. तसेच सध्या वाढती टँकरची मागणी लक्षात घेता अधिक फेऱ्या मारण्यासाठी बेदरकारपणे टँकर चालविले जात आहेत.

संतोष भुवन येथून पाण्याचा एक टँकर नालासोपाराच्या दिशेने जात असताना नियंत्रण सुटून राजकीय पक्षाच्या कार्यालयात घुसला होता. या टँकरचा वेग एवढा प्रचंड होता की थेट दरवाजा तोडून तो कार्यालयात शिरला. यावेळी कार्यालयात एक महिला सफाई कर्मचारी होती. मात्र ती या घटनेतून बचावली. या घटनेमुळे पुन्हा टँकर चालकांचा बेदरकारपणा समोर आला आहे. तर, याआधी २६ जानेवारी रोजी करण देसाई (२४) याचा टँकरच्या धडकेत मृत्यू झाला होता.

# दोन दिवसांत ३३ टँकरवर कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** भरधाव टँकरमुळे घडणारे अपघात रोखण्यासाठी वाहतूक विभागाने टँकवरविरोधातील कारवाई तीव्र केली आहे. अवघ्या दोन दिवसांतच ३३ टँकरवर कारवाई करण्यात आली आहे. टँकरचालकांकडून १८ हजार ५०० रुपये दंड वसूल केला आहे.

वसई-विरार शहरात टँकर चालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होत आहे. त्यामुळे अधूनमधून टँकर अपघाताच्या घटना समोर येत आहे. याआधी अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी टँकर चालक-मालक यांच्या बैठका घेतल्या होत्या. यावेळी वाहतूक नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र अवघे काही दिवस टँकरचालकांकडून नियमांचे पालन झाले. त्यानंतर पुन्हा नियम धाब्यावर बसवून टँकरचालकांचा बेदरकारपणा सुरूच आहे. त्यामुळे वाहतूक विभागाकडून टँकर तपासणी मोहीम सुरू केली जाणार आहे.

> “टँकरविरोधातील कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. प्रत्येक विभागात कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांना त्यांची तपासणी करण्याच्या सूचना केल्या आहेत.
> -सागर इंगोले,
> वरिष्ठ वाहतूक पोलीस निरीक्षक परिमंडळ २



# २१ तोळ्याचे दागिने पोलिसांनी केले परत

**मिरारोड :** काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतून बोरीवली येथे रिक्षाने जाताना एक बॅग रिक्षात गहाळ झाली होती. त्यामध्ये असलेले २१ तोळ्याचे सोन्याचे दागिने काशिमिरा पोलिसांनी ५ तासात शोधून त्यांना परत केले. काशिमिरा येथील माशाचा पाडा येथील एक कुटुंब बोरीवलीला जात होते. त्यांनी काशिमिरा येथून बोरीवलीला जाण्यासाठी रिक्षा पकडली. रिक्षाने जाताना त्यांनी एक सामानाची बॅग रिक्षाच्या सीटच्या मागे ठेवली होती. रिक्षातून उतरल्यानंतर रिक्षा निघून गेली. त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की आपली एक बॅग रिक्षामध्ये राहिली आहे. त्यांनी परत येऊन काशिमिरा पोलीस ठाण्यात तक्रार केली. तक्रार केल्यानंतर लगेच पोलिसांनी तपास सुरू केला. सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तपासून रिक्षाचा शोध घेत ती रिक्षा शोधून काढली. त्या रिक्षा चालकाला पाठीमागे ठेवलेली आहे याची माहिती नव्हती. पोलिसांनी तपास करून रिक्षा चालकाकडून ती बॅग घेऊन फिर्यादी यांना अवघ्या पाच तासात परत केली आहे. या बॅगेमध्ये १२ लाख रुपये किमतीचे २१ तोळे सोन्याचे दागिने होते. ते दागिने परत मिळाल्यामुळे त्या कुटुंबाने पोलिसांचे आभार व्यक्त केले.

CamScanner

(5)

पुढारी पान क्र. 7

# फाशीच्या शिक्षेतील आरोपीची सर्वोच्च न्यायालयात निर्दोष मुक्तता

## भाईंदरमधील अत्याचार व हत्या प्रकरण

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत २०१० मध्ये एका सहा वर्षीय मुलीवर बलात्कार करुन तीची हत्या केल्याप्रकरणी आरोपीला सत्र व उच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली होती. परंतू सर्वोच्च न्यायलयाने आरोपीची शिक्षा रद्द करुन त्याची निर्दोष मुक्तता केली आहे. याप्रकरणी निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने पोलीस तपासातील त्रुटी व चूकाबाबत ताशेरे ओढले आहेत.

भाईंदर पश्चिम येथील एका झोपडपट्टी परिसरात आपल्या कुटुंबासोबत राहणारी सहा वर्षांची मुलगी ११ जून २०१० रोजी रात्रीच्या जेवणानंतर खेळण्यासाठी घराबाहेर गेली होती त्यानंतर ती बेपत्ता झाली. दुसऱ्या दिवशी तिचा मृतदेह जवळच्याच नाल्यात सापडला. गुप्तांगासह तिच्या शरीरावर अनेक जखमा होत्या. शवविच्छेदनात मुलीवर बलात्कार करुन तीची हत्या झाल्याचे स्पष्ट झाले होते. भाईंदर पोलिसांनी गुन्हा नोंदवला. तपासाअंती पोलीसांनी प्रकाश निषाद (२४) या शेजारी राहणाऱ्या तरुणाला १३ जूनला गुन्ह्यात सहभाग असल्याच्या कारणावरून अटक केली. आरोपीला दोषी ठरवत मुलीच्या हत्येप्रकरणी फाशीची शिक्षा आणि इतर गुन्ह्यांसाठी कारावासाची शिक्षा सुनावली. ऑक्टोबर २०१५ मध्ये उच्च न्यायालयाने हा निकाल कायम ठेवला. उच्च न्यायालयाच्या निकालाला आरोपीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी १९ मे २०२३ रोजी याप्रकरणी निकाल दिला.या निकालात प्रकाश निषाद याची फाशीची शिक्षा रद्द करुन त्याची निर्दोष मुक्तता केली आहे. निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने पोलीसांनी केलेल्या तपासात प्रक्रियात्मक त्रुटी आणि चूका असल्याचे सांगत तपासाबाबत ताशेरे ओढले आहे. तपासामध्ये प्रमुख साक्षीदारांची उलटतपासणी न घेणे, घटनेच्या तपास साखळीत तफावत , घटनास्थळाचा नकाशा नसणे, आरोपीची घटनास्थळावरील उपस्थिती सिद्ध करणारा कोणताही ठोस पुरावा नसणे. डीएनए चाचणीसाठी रक्ताचे नमूने कोणी घेतले त्याची स्पष्टता नसणे,

आरोपीचा नोंदविण्यात आलेला जबाब त्याच्या मातृभाषेत वाचून न दाखवणे, मुलीच्या आई वडिलांनी सुरुवातीला आरोपीवर संशय व्यक्त न करणे, आरोपीबाबत पूर्वग्रह निर्माण करणे आदीमुळे आरोपीवर गुन्हा निश्चित करणे कठीण झाले असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

पुढारी पान क्र.5

# ४२ किलो गांजा विक्रीसाठी आलेल्या तिघांना अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत काही इसम हे गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती काशिमीरा पोलीसांना माहिती मिळाली. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.निरी. प्रशांत गांगुर्डे व पथक यांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने घोडबंदर रोडवरील वरसावे गावाचे हद्दीत जुना बंद टोल नाक्याजवळ सापळा लावून अभिषेक देवीदास वाघ (२५), अभिषेक जसवंत सिंग (२०), कुलदीप गुरनाम सिंग (२५) हे तिघे रिक्षा क्र. एम.एच.४८ बीएफ. ५६४६ यामध्ये आले होते. त्यावेळी त्या तिघांना रिक्षासह ताब्यात घेतले. त्या रिक्षाची झडती घेतली असता रिक्षा मध्ये चार प्लास्टीकच्या गोण्या मिळून आल्या. त्या गोण्यांची तपासणी केली असता त्यामध्ये ४,२०,००० रुपये किंमतीचा ४२ किलो गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. या आरोपीकडे केलेल्या चौकशीत त्यांनी हा गांजा अंमली पदार्थ हा ओरीसा राज्यातून विक्रीसाठी आणला असल्याचे सांगितले. आरोपी यांच्याकडुन ४२ किलो गांजा तसेच गुन्हयात वापरलेली रिक्षा असे मिळून ४,७०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

6

म.टा.पू. पान क्र. 1

# नायगाव खाडीपुलाची रखडपट्टी सुरूच


## जिन्याच्या पत्र्यांनाही चढला गंज

म. टा. वृत्तसेवा, वसई

नायगाव पूर्व येथील खाडी पुलाच्या उताराच्या जागेचे प्रकरण न्यायालयात गेल्याने मागील नोव्हेंबर महिन्यापासून या पुलाच्या कामाची रखडपट्टी झाली आहे. त्यातच आता पुलाच्या जिन्याच्या पायऱ्यांवरील पत्र्यांना भोके पडल्याने पूल पूर्ण होण्याआधीच पत्रे गंजण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पावसाळ्यात या पुलावरून ये-जा करताना नागरिकांना त्रास सहन करावा लागणार आहे.

नायगाव पूर्वेला सोपारा खाडी आहे. नायगाव येथील रहिवासी नायगाव रेल्वे स्थानकाकडे जाण्यासाठी या खाडीवरील जुन्या लोखंडी पुलाचा वापर करत असत. मात्र हा पूल धोकादायक झाल्याने, सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे नवीन पादचारी पूल बांधण्यात आला आहे. या पादचारी पुलावरून दररोज हजारो प्रवासी जातात. हा पादचारी पूल अर्धवट अवस्थेतच नागरिकांसाठी खुला करण्यात आला होता. मात्र गेल्या सात वर्षांपासून या पुलाचे काम अर्धवटच आहे. त्यातच मध्यंतरी निधीची कमतरता निर्माण झाल्याने पुलाचे काम थांबले होते. त्यावेळी महापालिकेने बांधकाम विभागाला एक कोटी रुपये दिल्यानंतर अखेर काम सुरू झाले. परंतु त्यानंतर, पुलाच्या पश्चिमेकडील बाजूच्या उताराचे काम सुरू झाल्यानंतर, मिठागरचालकांनी पुलासाठी जागा देण्यास विरोध करत न्यायालयात धाव घेतली. त्यामुळे नोव्हेंबरपासून पुलाचे काम बंदच आहे.

जूचंद्र, चंद्रपाडा, बापाणे, मालजीपाडा, ससुनवघर, टिवरी, राजावली, परेरा नगर, कामण, चिंचोटी, देवदल, पोमण अशा गावांतील हजारो लोकांना नायगाव स्थानकाकडे जाण्यासाठी हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे येथून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करत असतात. मात्र सद्यस्थितीत पुलाच्या पायऱ्यांवरील पत्र्यांना गंज लागला आहे. त्याचा फटका पावसाळ्यात बसण्याची भीती आहे. बांधकाम विभागाने याकडे तातडीने लक्ष घालून पायऱ्या दुरुस्त करण्याची मागणी येथील रहिवासी करत आहेत.





**“ पुलाच्या पश्चिमेकडील काम सुरू करण्यात आले होते. परंतु पश्चिमेकडील मिठागरचालकांनी जागा देण्यास विरोध करत न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार नोव्हेंबर २०२२पासून पुलाचे काम बंद आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतरच काम सुरू करता येणार आहे.**

– प्रशांत ठाकरे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

# गुंगीचे औषध देऊन वाहनचालकांची लूट

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

वाहनचालकांना गुंगीचे औषध देऊन लुटणाऱ्या तीन प्रवाशांच्या एका टोळीला मिरा-भाईंदरच्या काशिमिरा गुन्हे शाखेने नुकतीच अटक केली आहे. त्यांच्याकडून सुमारे सहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या टोळीने मिरा-भाईंदरसह मुंबई व ठाण्यातील अनेक वाहनचालकांना लुटल्याचे समोर आले आहे.

मिरा-भाईंदरमध्ये रिक्षा चालवत असताना एका रिक्षाचालकाला १६ मार्च रोजी बोरिवलीच्या प्रवाशाचे भाडे आले होते. त्यानुसार संबंधित प्रवाशाला बोरिवलीला घेऊन जात असताना, या रिक्षाचालकाला प्रथम गुंगीचे औषध घातलेले शीतपेय पिण्यासाठी देण्यात आले. रिक्षाचालक बेशुद्ध झाल्यानंतर त्याच्या गळ्यातील सोनसाखळी घेऊन प्रवाशाने पळ काढला होता. या घटनेची तक्रार मिरा रोडच्या नया नगर पोलिस ठाण्यात दाखल केल्यानंतर, अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाचा गुन्हे शाखेनेही समांतर तपास सुरू केला होता. यावेळी हाती आलेल्या तांत्रिक माहितीआधारे गुजरातमधून सागर परेख, संपतराज जैन व सुभाष पाटील या तिघांना अहमदाबाद जिल्ह्यातून अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडे रिक्षाचालकाच्या सोनसाखळीच्या शिवाय पाच लाख ९० हजार रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल आढळला. या टोळीविरोधात मुंबई उपनगरांतील विविध आठ पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल असल्याची बाबदेखील समोर आली आहे.

# गटारसफाईची कामे अपूर्णच

म. टा. वृत्तसेवा, वसई

वसई विरार महापालिकेतर्फे सध्या नालेसफाई जोरात सुरू आहे. मात्र अजूनही रस्त्याची कामे पूर्ण झालेली नसून गटारांची स्वच्छतादेखील अपूर्ण आहे. रस्त्याच्या अपूर्ण कामांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे पावसाळ्याआधी ही कामे पूर्ण करावीत, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे.

वसई-विरार शहर महापालिकेतर्फे नालेसफाई वेगाने सुरू असली, तरी दुसरीकडे गटारांची साफसफाई होत नसल्याचा आरोप वसई काँग्रेसतर्फे करण्यात आला आहे. रस्त्यालगत केलेले खोदकाम, खड्डे पडलेले रस्ते हे सुद्धा पाणी तुंबून राहण्यास कारणीभूत असतात. मात्र शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांचे काम सुरू असून खोदकाम केलेले आहे. मागील तीन महिन्यांपासून सुरू केलेले काही रस्त्यांचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. त्याचा त्रास नागरिकांना होत आहे. अजूनही या रस्त्यांची कामे पूर्ण झालेली नसून पावसाळ्यात त्यामुळे नागरिकांना आणखीन त्रास सहन करावा लागणार आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी ही सर्व कामे पूर्ण करावीत, अशी मागणी वसई विरार शहर जिल्हा युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष कुलदीप वर्तक यांनी वसई-विरार शहर महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

CamScanner

7

म.टा.पू.पान क्र.1

# कॅन्सरग्रस्तांना मदतअर्ज देण्यास टाळाटाळ

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

## नातेवाईकांकडून नाराजी व्यक्त

मिरा-भाईंदर महापालिकेकडून कॅन्सरग्रस्तांना उपचारासाठी दिली जाणारी आर्थिक मदत प्राप्त करण्यासाठी अनेक जण पालिका मुख्यालयात दररोज फेऱ्या मारत आहेत. मात्र आवश्यक माहिती सादर करण्यासाठीचा अर्ज देण्यास पालिका कर्मचारी विविध कारणे पुढे करत टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

पालिका हद्दीतील कॅन्सरग्रस्त गरीब व गरजू महिला तसेच पुरुषांना उपचारासाठी प्रशासनाकडून दरवर्षी प्रति रुग्ण २५ हजार रुपये मदत दिली जाते. यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांनी पालिकेचा अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. यासाठी पालिका प्रशासनाकडे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर अर्ज येतात. यातील पात्र रुग्णांच्या बँक खात्यात ही आर्थिक मदत जमा केली जाते.

मुंबई उपनगरातील इतर शहरांप्रमाणे मिरा-भाईंदरमध्ये गरीब, गरजू रुग्णांना आर्थिक मदत करणाऱ्या संस्था नाहीत. त्यामुळे पालिकेकडून दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या प्रतीक्षेत अनेक जण असतात. मागील काही दिवसांपासून कॅन्सरग्रस्तांचे नातेवाईक पालिका मुख्यालयात आर्थिक मदत प्राप्त करण्यासाठी येत आहेत. मात्र मदतीसाठीचे अर्ज देण्यास कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ केली जात असल्याचा त्यांचा अनुभव आहे.

अद्याप अर्थसंकल्प लागू करण्यात न आल्याने अर्ज दिले न जात नसल्याचे उत्तर दिले जात आहे. परिणामी रुग्णांच्या नातेवाईकांना मोकळ्या हाताने घरी परतावे लागत आहे.

या संदर्भात महिला व बालकल्याण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याकडे विचारणा केली असता, दोन ते तीन दिवसांत अर्ज वाटप सुरू केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

म.टा.पान क्र.3

# 'अतिकप्रमाणे माझ्या घातपाताची शक्यता'

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

## समीर वानखेडे यांच्याकडून भीती व्यक्त



भ्रष्टाचार आणि खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यामुळे अडचणीत आलेले एनसीबीचे तत्कालीन विभागीय संचालक समीर वानखेडे यांनी आपल्या जिवाला धोका असल्याची भीती व्यक्त केली आहे. अतिक अहमदप्रमाणे माझे बरेवाईट केले जाऊ शकते असे सांगतानाच त्यांनी मुंबईचे पोलिस आयुक्त फणसळकर यांना त्यांनी पत्र लिहिले आहे. या पत्रातून त्यांनी विशेष पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली आहे.

भ्रष्टाचार आणि खंडणी प्रकरणात दाखल गुन्ह्यांमध्ये सलग दोन दिवस पाच तास चौकशी झाल्यानंतर समीर वानखेडे हे सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात हजर झाले. तत्पूर्वी त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना आपल्या जिवाला धोका असल्याचे सांगितले. यासाठी पोलिस आयुक्तांना पत्र लिहिले असून त्यातून या प्रकरणी चौकशी करण्याची तसेच विशेष संरक्षण देण्याची मागणी केली असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे मला आणि पत्नी क्रांती हिला मोबाइलवर तसेच समजामध्यमांवर गंभीर धमक्या येत आहेत. सीबीआयने गुन्हा दाखल केल्यापासून या धमक्या सुरू झाल्या असून वेगवेगळी नावे, क्रमांक आणि समाजमाध्यमांवरील खाती वापरून या धमक्या दिल्या जात असल्याचे वानखेडे यांनी सांगितले.

### दक्षता समितीचा ठपका

आर्यन खान ड्रग्ज प्रकरणात एनसीबीचे तत्कालीन विभागीय संचालक समीर वानखेडे यांच्या कार्यपद्धतीवर एनसीबीच्याच दक्षता समितीने ठपका ठेवला. आर्यनला सोडविण्यासाठी २५ कोटी मागितल्याचा आणि ५० लाख रुपये घेतल्याचा आरोप समीर वानखेडे आणि त्यांच्या पथकावर करण्यात आला. दक्षता समितीच्या अहवालाच्या आधारे सीबीआयने समीर एनसीबीचे तत्कालीन अधीक्षक विश्व विजय सिंग, गुप्तचर अधिकारी आशिष रंजन यांच्यासह के. पी. गोसावी आणि सॅनविल डिसोझा या दोन व्यक्तींवर गुन्हा दाखल केला असून सीबीआयमार्फत या गुन्ह्याचा तपस सुरू आहे.

CamScanner